**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर**
**करारबध्द पध्दतीने मासिक मानधनावर थेट मुलाखतीद्वारे नेमणुकी बाबत**
**(Walk In Interview)**

अहमदनगर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा, बांधकाम विभाग, नगररचना विभाग, विद्युत विभागासाठी करारबध्द पध्दतीने सहा महिन्याच्या कालावधीकरिता मासिक मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करीता खालील दर्शविलेल्या पदांवर पात्र अर्जदारांच्या थेट पध्दतीने मुलाखती आयोजित करण्यांत येत आहेत.

तरी संबधित पात्र धारकांनी शैक्षणिक पात्रता, अनुभव दाखला व तद्नुषंगिक नमूद केल्यानुसार सर्व प्रमाणपत्राच्या सांक्षाकित प्रतीसह जोडलेला अर्ज मा.आयुक्त,अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर यांचे नावे करुन अर्जासह दिनांक १७ / १० / २०२२ रोजी सकाळी १०:०० वाजता समक्ष आवश्यक त्या सर्व मुळ कागदपत्रासह मा.आयुक्त कार्यालय,अहमदनगर महानगरपालिका, औरंगाबाद रोड येथे थेट पध्दतीने मुलाखतीसाठी उपस्थित रहावे, उशिरा आलेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही, **सदर करारबध्द पध्दतीने नियुक्ती बाबतच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे राहतील.**

| अं. क्र | विभागाचे नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदांचे नांव | पद संख्या | आवश्यक शैक्षणिक पात्रता | मासिक मानधन वेतन |
|---|---|---|---|---|---|
| १ | पाणी पुरवठा | कनिष्ठ अभियंता (सिव्हील) | ४ | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी परीक्षा उर्त्तीर्ण.<br>ब) MSCIT किंवा तत्सम प्रमाणपत्र आवश्यक.<br>क) पद्वित्तर पदवीधारक / ५ वर्षाचा प्रशासकीय कामाचा अनुभव असणा-यास प्राधान्य. | २५,०००/- |
| | | कनिष्ठ अभियंता (मेकॅ.) | १ | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची यांत्रिकी अभियांत्रिकी शाखेची पदवी परीक्षा उर्त्तीर्ण.<br>ब) MSCIT किंवा तत्सम प्रमाणपत्र आवश्यक.<br>क) पद्वित्तर पदवीधारक / ५ वर्षाचा प्रशासकीय कामाचा अनुभव असणा-यास प्राधान्य. | २५,०००/- |
| २ | बांधकाम | कनिष्ठ अभियंता (सिव्हील) | ७ | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी परीक्षा उर्त्तीर्ण.<br>ब) MSCIT किंवा तत्सम प्रमाणपत्र आवश्यक.<br>क) पद्वित्तर पदवीधारक / ५ वर्षाचा प्रशासकीय कामाचा अनुभव असणा-यास प्राधान्य. | २५,०००/- |
| ३ | नगररचना | कनिष्ठ अभियंता (सिव्हील) | ४ | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी परीक्षा उर्त्तीर्ण.<br>ब) MSCIT किंवा तत्सम प्रमाणपत्र आवश्यक.<br>क) पद्वित्तर पदवीधारक / ५ वर्षाचा प्रशासकीय कामाचा अनुभव असणा-यास प्राधान्य. | २५,०००/- |
| ४ | विद्युत | विद्युत पर्यवेक्षक | १ | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची विद्युत अभियांत्रिकी शाखेची शाखेची पदवी परिक्षा उर्त्तीर्ण.<br>ब) MSCIT किंवा तत्सम प्रमाणपत्र आवश्यक.<br>क) पद्वित्तर पदवीधारक / ५ वर्षाचा प्रशासकीय कामाचा अनुभव असणा-यास प्राधान्य. | २५,०००/- |

## मासिक मानधनावर नियुक्तीसाठी अटी व शर्ती

१. सदर मासिक वेतना व्यतिरिक्त शासन सेवा व शर्ती अंतर्गत महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती व अटी) नियम १९८१ नुसार सदरची नियुक्ती नसल्याने त्यानुषंगाने मिळणारे निवृत्ती वेतन, विमा योजना, भविष्य निर्वाह निधी, तसेच कायम सेवेच्या कोणत्याही प्रकारचे लाभ अनुज्ञेय राहणार नाहीत.

२. निवड झाल्यानंतर नियुक्त धारकांनी मासिक मानधनावर करारबध्द पध्दतीने रुजु होणे पुर्वी पोलीस प्राधिका-याकडील चारित्र्य

पडताळणी प्रमाणपत्र व मा.जिल्हा शल्य चिकित्सक,अहमदनगर यांचेकडील सक्षम असलेबाबतचे प्रमाणपत्र देणे आवश्यक राहील.

३. नियुक्तीधारकांचे सदर करारबध्द नियुक्ती कालावधीतील काम समाधानकारक न आढळल्यास व त्यांचे सेवा विषयक काही तक्रारी उद्‌भवल्यास पुर्वसूचना न देता दिलेली मासिक मानधनावरील करारबध्द पध्दतीने नियुक्ती तात्काळ संपुष्टात येईल व त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबधित नियुक्ती धारकावर राहील.

४. सदर निवड झालेल्या संबधितांची मासिक मानधनावरील करारबध्द नियुक्तीचा कालावधी समाप्तीनंतर त्यांना कोणतेही अधिकार राहणार नाहीत.

५. सदर नियुक्ती पुर्णतः मासिक मानधन तत्वानुसार कराराप्रमाणे अटी व शर्ती नुसार तात्पुरत्या स्वरुपात असल्याने सदर नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर सेवेत कायम नियुक्ती होणे बाबत व कायम सेवेचे कुठल्याही प्रकारचे फायदे मिळणे करीता नियुक्तीधारकास मा.न्यायालयात अथवा मा.उच्च न्यायालयात याबाबत दाद मागता येणार नाही,सदरची मुदत संपल्यानंतर सदरचा करारबध्द नियुक्ती आदेश हा अपोआप व्यपगत होईल.

६. नियुक्त झालेल्या संबधितांना नियुक्ती मानधनावरील कालावधीमध्ये कार्यालयीन परवानगी शिवाय त्यांना कार्यक्षेत्र सोडता येणार नाही.

७. निवड झालेल्या संबधितांना सदर नियुक्ती कालावधीतील मानधनावरील सेवेचा राजीनामा दयावयाचा असेल तेव्हा मा.आयुक्त,अहमदनगर महानगरपालिका यांचेकडे १५ दिवसाच्या आतं त्यांना याबाबत पुर्व सुचना म्हणुन नोटीस दयावी लागेल.

८. सदर मासिक वेतन कालावधीतील नियुक्ती करीता दिलेली माहिती खोटी असल्याचे निष्पन्न झाल्यास उपरोक्त करारबध्द नियुक्ती तात्काळ रद्द करण्यांत येवून सेवा समाप्त करण्यांत येईल.तसेच संबधित उमेदवारांनी यापुर्वी नोकरी बाबत अर्ज दिलेला असल्यास यापुर्वीचा तो अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाही.

९. विवाहीत असल्यास एक पती किंवा एक पत्नी असावे.

१०. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम ०५ मधील प्रतिज्ञा पत्राचा नमुना अ (नियम ४) अपत्याबाबतचे प्रतिज्ञापत्र करुन दयावे लागेल.

११. तात्पुरत्या स्वरुपात सदर करारबध्द नियुक्ती कालावधीमध्ये सेवेत हलगर्जीपणा, निष्काळजीपणा व इतर काही त्रुटी उद्‌भवल्यास त्या बाबतची सर्वस्वी जबाबदारी ही नियुक्त झालेल्या संबधितांवर राहील व त्यांचेवर नियमानुसार कारवाई करण्यांत येईल.

१२.मुलाखती बाबतचे सर्व अधिकार व हक्क,पदांच्या फेरबदल व अटी व शर्ती बाबतचा अधिकार आणि सदर जाहिराती मधील पदे भरणे बाबत कोणताही अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मा.आयुक्त,अहमदनगर महानगरपालिका यांना राहील,कोणताही किंवा सर्व अर्ज काही कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार राखून ठेवीत आहेत, व याबाबत कोणत्याही अर्जदारास त्याबाबत लेखी कळविण्यात येणार नाही.

१३. मासिक मानधनावरील करारबध्द नियुक्ती झालेल्या संबधितांनी सदरचा नियुक्ती आदेश मिळताच ७ दिवसाचे आत संबधित विभागात हजर व्हावे लागेल अन्यथा सदर दिलेला नियुक्ती आदेश तात्काळ संपुष्टात आलेबाबत समजण्यात येईल.

१४. सदर करारबध्द नियुक्त झालेल्या संबधितांनी वरील सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे तसे लेखी करारपत्र रु. १००/- च्या मुद्रांकावर साक्षांकीत करुन देणे बंधनकारक आहे.

**स्थळ प्रतीवर मा.आयुक्त यांची स्वाक्षरी असे.**

**उपायुक्त**
**अहमदनगर महानगरपालिका**